श्री. मुरलीधर रामचंद्र झोपे, सांख्यिकी अधिकारी, गट-ब, सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत..

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्वेसेनि-२०१९/प्र.क्र.८१/सेवा-१
गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकुल इमारत, ८ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१.
दिनांक :- १३ मे, २०१९.

वाचा:- संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/सारासे/गट-ब/कक्ष-४/स्वेसेनि/ झोपे/सांअ/२५०-५२/१९, दि. ०५/०३/२०१९.

शासन निर्णय:-

सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे यांच्या येथे कार्यरत असलेले श्री. मुरलीधर रामचंद्र झोपे, सांख्यिकी अधिकारी, गट-ब,यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस होऊन सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि. ०९.०६.१९९२ अन्वये नामनिर्देशनाने नियुक्ती झाली आहे. श्री. झोपे यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ नियम ६२ (२) नुसार स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याबाबत निवेदन दिल्याने, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ नियम ६६ (१) मधील तरतुदीनुसार त्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती मिळाल्याच्या दिनांकापासून पुढे २० वर्षांची अर्हताकारी सेवा दि. ०४.०७.२०१२ रोजी पूर्ण झालेली असल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ नियम ६६ (५) नुसार श्री. मुरलीधर रामचंद्र झोपे यांनी स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस विहीत कालावधीत मागे न घेतल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ नियम ६६ (२) नुसार श्री. झोपे हे आपोआपच स्वेच्छा सेवानिवृत्तीच्या नोटीशीच्या समाप्तीच्या दिनांकास स्वेच्छा सेवानिवृत्त (Deemed to retire) झाले आहेत. सबब, श्री. मुरलीधर रामचंद्र झोपे यांनी दि. १५.१२.२०१८ च्या अर्जान्वये दिलेली स्वेच्छा सेवानिवृत्तीची सूचना स्विकारण्यात आली असून, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ नियम ६६ (१) (२) (५) मधील तरतुदीनुसार श्री. मुरलीधर रामचंद्र झोपे, सांख्यिकी अधिकारी हे दि. १५.०३.२०१९ (म.पू.) पासून स्वेच्छेने सेवानिवृत्त झाले असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०८१७३३५३१५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhise Govind Changoji

Digitally signed by Bhise Govind Changoji
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e9596d652d5b6cb0f88e4c39c6c2adf97629debbf12176865f2683a6eb9318e8, cn=Bhise Govind Changoji
Date: 2019.05.16 13:19:35 +05'30'

(डॉ. गोविंद भिसे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

महालेखापाल (लेखा परीक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता) -१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
सहसंचालक, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे
उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिआ), पुणे.
श्री. मुरलीधर रामचंद्र झोपे, सांख्यिकी अधिकारी (आरोग्य सेवा संचालनालयामार्फत)
निवड नस्ती सेवा-१.